झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
Email : info@sra.gov.in

क्र. झोपुप्रा / प्रशा / कार्या -१/ टे -१ / ६३० /११
दिनांक :- २७.०५.२०११

परिपत्रक क्र. १२६

विषय :- माहिती अधिकार २००५ अंतर्गत फी जमा करण्याची कार्यपध्दती.

१. परिपत्रक क्र. ११०, दिनांक ९ मार्च २०११ अन्वये माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत फी जमा करण्याचे कार्यपध्दती पारित करण्यात आली आहे. त्या नुसार माहितीच्या अधिकाराखाली माहितीचे शुल्क सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखाशाखेत स्विकारले जाईल अशा प्रकारची सुचना आहे.

२. झोपडपट्टी पुनर्वसन कार्यालयातील प्रवेशावर नियंत्रण ठेवण्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यालयीन परिपत्रक क्र. झोपुप्रा / प्रशा / कार्या -१/ टे -२/ ५८७/११, दिनांक २५.०४.२०११ अन्वये उपाययोजना अंमलात आणण्याबाबत सुचना पारित केलेल्या आहेत. त्यानुसार अभ्यागंताना दुपारी २.०० ते ५.०० वाजेपर्यंत कार्यालयातील अधिका-यांना भेटण्याची अनुमती देण्यात आलेली आहे. सकाळी कार्यालयीन वेळे पासुन दुपारी २.०० वाजेपर्यंत परवाना धारक वास्तुविशारद व्यतीरीक्त अन्य कोणासही प्रवेशास मुभा असणार नाही, अशा सुचना दिलेल्या आहेत.

३. वरील परिच्छेद २ मधील वास्तुस्थिती विचारात घेऊन माहितीचा अधिकाराखालील माहितीचे शुल्क सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्याबाबतच्या वेळेत खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

"माहितीच्या अधिकाराखालील माहितीचे शुल्क दुपारी २.०० ते ५.०० वाजेपर्यंत लेखाशाखेत स्विकारले जाईल याबाबत संबंधित राज्य जन माहिती अधिकारी अर्जदाराना पाठविण्याच्या पत्रात तसा उल्लेख करतील ".

४. वरील बदलाची नोंद कृपया घेण्यात यावी.

( बी. एन. बास्टेवाड )
(प्र) सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रतिलीपी
१.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक. कृ. मा. प.

C:\Documents and Settings\Rajeshri\Desktop\RTI\circular.doc